# प्रेसनोट

दि.२६/०५/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया चालु आहे. |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | अशिफ जैनुद्दिन शेख, वय ४१ वर्ष, प्रतीलिपीक, वर्ग ३, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ५००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ५००/- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे शेतजमीनीचे रस्त्याबाबत कोर्ट केस सुरु होती. सदर कोर्ट केसचे कामकाजा करीता तक्रारदार यांना राहुरी खुर्द व राहुरी बुद्रुक गावांच्या नकाशाच्या प्रतींची आवश्यकता होती. सदर नकाशांच्या प्रती मिळण्याकरीता तक्रारदार यांनी उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राहुरी या कार्यालयात अर्ज दिला होता व आरोपी लोकसेवक अशिफ जैनुद्दिन शेख, प्रती लिपीक, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांची भेट घेतली होती. त्यावेळी यातील आरोपी लोकसेवक शेख यांनी तक्रारदार यांना गावांच्या नकाशाच्या प्रती देण्याकरीता ५००/- रुपये लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे दिलेल्या तक्रारीवरुन सदर लाचेचे मागणीबाबत पडताळणी केली असता, आज दि.२६/०५/२०२० रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक शेख यांनी राहुरी खुर्द व राहुरी बुद्रुक गावांच्या नकाशाच्या प्रती देण्याकरीता पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ५००/- रुपये लाचेची केली व ती रक्कम आज दि.२६/०५/२०२० रोजी भुमी अभिलेख कार्यालय राहुरी, येथे तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्वीकारली असता आरोपी लोकसेवक शेख यांना रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

([illegible])

पोलीस उप अधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

अहमदनगर

Scanned with CamScanner